Impact Factor-8.632 (SJIF)

ISSN-2278-9308


# B.Aadhar

**Single Blind Peer-Reviewed & Refereed Indexed**

**Multidisciplinary International Research Journal**

## December - 2024

**ISSUE No - (D) 500**




**Chief Editor**
**Prof. Virag S. Gawande**
**Director**
**Aadhar Social Research & Development Training Institute Amravati**

**Editor**
**Dr.Manashi Gogoi Borgohain**
**Head Department of Education**
**Nandalal Borgohain City College, Dibrugarh , Assam**

**This Journal is indexed in :**

- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : *www.aadharsocial.com*

Aadhar Publications

# महिलांचा औद्योगिक सहभाग व सक्षमीकरण

प्रा. देशमुख सोनाली साहेबराव
(नूतन कला ,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय राजापूर, सहाय्यक प्राध्यापक,वाणिज्य विभाग )

**प्रस्तावना**

सामाजिक आणि सांस्कृतिक परिवर्तनातून समाजामध्ये वेगवेगळया समस्या निर्माण होतात आजच्या आधुनिक काळात महिला सक्षमीकरण हा विशेष चर्चेचा विषय आहे आपल्या आदी ग्रंथांमध्ये स्त्रियांचे महत्त्व लक्षात घेऊन सांगण्यात आले आहे की" यंत्र नार्यस्तु पूज्यनते रमनेते तंत्र देवता"अर्थात जिथे स्त्रियांची पूजा केली जाते तेथे देवता वास करतात पण गंमत पहा स्त्रियांमध्ये इतकी शक्ती असूनही तिच्या सक्षमीकरणाची नितांत गरज आहे महिला आर्थिक सक्षमीकरण म्हणजेच त्यांचे आर्थिक निर्णय उत्पन्न मालमत्ता आणि इतर गोष्टींची उपलब्धता या सुविधा मिळवूनच ते त्यांचा सामाजिक स्तरावर जाऊ शकतात

सक्षमीकरणांमध्ये स्त्रियांना स्व सामर्थ्याची जाणीव करून देणे सामाजिक आर्थिक सांस्कृतिक क्षेत्रात स्त्रियांना विशेष स्थान देणे देशपातळीवर सामाजिक राजकारण आणि आर्थिक प्रस्तावावर चर्चेत सहभागी करून घेणे .स्त्रियांना शिक्षण आरोग्य रोजगार यामध्ये समान संधी त्यांच्यामध्ये समान वागणूक देणे .स्त्रिया व मुलांवर सतत होणाऱ्या अत्याचारांना आळा घालणे. भारतात महिलांचे सक्षमीकरण करण्यासाठी सर्वप्रथम त्या सर्व राक्षसी विचारांना मारणे आवश्यक आहे जे समाजातील त्यांचे हक्क आणि मूल्य मारतात जसे की हुंडा प्रथा निक्षरता लैंगिक हिंसा असमानता भ्रूणहत्या महिलांवरील घरगुती हिंसाचार वैश्यव्यवसाय मानवी तस्करी इत्यादी. सक्षमीकरणामध्ये स्त्रियांना स्व सामर्थ्याची जाणीव करून देणे सामाजिक आर्थिक सांस्कृतिक क्षेत्रात स्त्रियांना विशेष स्थान देणे देशपातळीवर सामाजिक राजकारण आणि आर्थिक प्रस्तावावर चर्चे सहभागी करून घेणे स्त्रियांना शिक्षण आरोग्य रोजगार यामध्ये समान संधी देणे त्यांच्यामध्ये समान वागणूक देणे स्त्रिया व मुलींवर सतत होणाऱ्या अत्याचारांना आळा घालणे.महिला सक्षमीकरणाचा खरा अर्थ तेव्हा समजेल जेव्हा त्यांना चांगले शिक्षण दिले जाईल आणि त्यांना इतकी सक्षम केले जाईल की त्या प्रत्येक क्षेत्रात स्वतंत्र होऊन निर्णय घेणे सक्षम होतील.

**महिला सक्षमीकरणाचा अर्थ**

महिलांमध्ये जी शक्ती येते त्यातून ती तिच्या जीवनाशी संबंधित प्रत्येक निर्णय स्वतः घेऊ शकते आणि कुटुंब आणि समाजात चांगले जगू शकते महिला सक्षमीकरण म्हणजे त्यांना समाजात त्यांचे खरे अधिकार मिळवून देणे.

महिला सक्षमीकरण म्हणजेमहिलांच्या शक्तीचा विकास आणि परिष्कृत करणे आणि तिला सामाजिक ,आर्थिक राजकीय, न्याय ,विचार, स्वातंत्र्य श्रद्धा ,धर्म आणि उपासना संधीची समानता प्रदान करणे आहे.

**उद्दिष्टे**

१) महिला सक्षमीकरणाची गरज अभ्यासणे.
२) महिला सक्षमीकरणाच्या मार्गातील अडथळे अभ्यासणे.
३) महिला सक्षमीकरणाचे फायदे अभ्यासणे.
४) महिलांचे औद्योगिक दृष्ट्या योगदान अभ्यासणे.

**महिला सक्षमीकरणाची गरज**

महिला सक्षमीकरणाचे अनेक कारणे आहेत त्यामुळे महिला सक्षमीकरणाची गरज निर्माण झाली कारण भारतामध्ये लैंगिक असमानता होते आणि प्राचीन काळापासून हा पुरुषप्रधान समाज होता महिलांना त्यांच्याच कुटुंबाकडून आणि समाजाकडून अनेक कारणाने दडपण्यात आले आणि कुटुंबात आणि समाजात त्यांच्या अनेक प्रकारचे हिंसाचार आणि भेदभावाला त्यांना सामोरे जावे लागते हे केवळ भारतातच नाही तर देशांमध्येही दिसून येते

१)समाजात महिलांना सन्मान देण्यासाठी आई बहीण ,मुलगी, पत्नी यास या रूपात महिला देवतांची पूजा करण्याचे परंपरा आहे परंतु आज ती केवळ ती दिखावा च राहिली आहे

२) महिलांना शिक्षण मिळावे आणि कुटुंबाचा उदरनिर्वाह होण्यासाठी त्यांना शिक्षणाची संधी देणे ही काळाची गरज आहे.

३) महिलांना समाजातील त्यांची हक्क आणि कर्तव्य समजून घेण्यासाठी त्यांना मोफत आणि सक्तीचे शिक्षण दिले पाहिजे.

४) महिलांना मूलभूत कार्य कौशल्याची संधी उपलब्ध करून देणे म्हणजेच त्यांच्या आर्थिक उन्नतीचा प्रक्रियेला बळ देणे.
५) महिलांना आर्थिक दृष्ट्या सक्षम करणे महत्त्वाचे आहे

**महिला सक्षमीकरणाच्या मार्गातील अडथळे**

समाजामध्ये अनेक समाज आहेत ज्यामध्ये अनेक प्रकारच्या रुढी श्रद्धा आणि परंपरांचा समावेश आहे यांपैकी काही जुन्या समजुती आणि परंपरा असे आहेत त्या महिला सक्षमीकरणात अडथळा ठरतात त्यातील काही बंधने पुढील प्रमाणे

१) समाजातील पुरुषी वर्चस्वामुळे स्त्रियांसाठी समस्या निर्माण होतात कामाच्या ठिकाणी महिलांवरील हिंसाचार अलीकडच्या काळात खूप वेगाने वाढला आहे आणि गेल्या काही दशकांमध्ये त्याचे सुमारे 170 टक्के वाढ झाली आहे

२) अनेक भागात महिलांना शिक्षण आणि नोकरीसाठी घराबाहेर पडण्याची परवानगी ही नाही यासोबतच त्यांना स्वतंत्रपणे काम करण्याचे किंवा कुटुंबाशी संबंधित निर्णय घेण्याची स्वतंत्र नसते आणि प्रत्येक कामात त्यांना नेहमीच पुरुषांपेक्षा कमी समजले जाते.

३) महिलांमध्ये निरक्षरता आणि अभ्यास सोडणे यासारख्या समस्या देखील महिला सक्षमीकरणाचे प्रमुख अडथळे आहे शहरी भागातील मुली शिक्षणाच्या बाबतीत मुलांच्या बरोबर येणे असल्या तरी ग्रामीण भागात त्या खूपच मागे आहेत.

४) गेल्या काही दशकांमध्ये सरकारने घेतलेल्या प्रभावी निर्णयामुळे बालविवाह सारख्या दृश्य कृत्यामध्ये मोठ्या प्रमाणात घट झाली असली तरी 2018 मधील युनिसेफ च्या अहवालात असे दिसून आले की अजूनही दरवर्षी सुमारे 15 लाख मुलींचे वय 18 वर्षांपूर्वीच लग्न केले जाते लवकर लग्न झाल्यामुळे महिलांचा विकास थांबतो आणि त्या शारीरिक आणि मानसिक दृष्ट्या वाढू शकत नाही.

५) स्त्री भरून हत्या किंवा लिंग आधारित गर्भपात या भारतातील महिला सक्षमीकरणाच्या मार्गातील सर्वात मोठा अडथळा आहे स्त्रीभ्रूणहत्या म्हणजेच लिंगाच्या आधारे भ्रूणहत्या चे अंतर्गत स्त्रीभ्रूण आढळून आल्यावर आईच्या संमतीशिवाय गर्भपात केला जातो . स्त्रीभ्रूण हत्येचा समोर उच्चांकन केल्याशिवाय आपले महिला सक्षमीकरणाची हे दावे पूर्ण होणार नाहीत.

६) नोकरदार महिला देखील त्यांच्या सुरक्षतेच्या दृष्टीने रात्री उशिरा सार्वजनिक वाहतूक वापरत नाहीत खऱ्या अर्थाने महिला सक्षमीकरण तेव्हाच होऊ शकते ते जेव्हा मुलांची सुरक्षितता सुनिश्चित करता येईल आणि पुरुषांप्रमाणे त्याही बिनधास्तपणे कुठेही येऊ शकतील.

**महिला सक्षमीकरणाचे फायदे**

महिला सक्षमीकरणाशिवाय ती जुन्या परंपरा आणि वाईट गोष्टींना तोंड देऊ शकत नाही. महिला सक्षमीकरणाशिवाय स्त्रीला देश आणि समाजात नेहमीच तिथे स्थान मिळू शकत नाही. महिला सक्षमीकरणासाठी तिच्या वैयक्तिक स्वातंत्र्य आणि तिच्या निर्णयावर अधिकार मिळू शकत नाही. महिला सक्षमीकरणामुळे महिलांच्या जीवनात अनेक बदल झाले आहे.

१) स्त्रेया त्यांच्या जीवनाशी संबंधित निर्णय स्वतः घेत आहेत.
२) पुरुष आता महिलांना समजून घेत आहेत त्यांना त्यांची हक्क देत आहेत.
३) स्त्रेया प्रत्येक कामात सक्रिय सहभाग घेऊ लागले आहेत.
४) पुरुष आता स्त्रियांच्या निर्णयांचा आदर करू लागले आहेत हक्क मागून हिरावून घ्यावा लागतो आणि महिलांनी त्यांच्या कर्तुत्वाने आणि संघटित मणी पुरुषांकडून हक्क मिळवले आहेत असेही म्हणतात.

महिला सक्षमीकरण महिलांना केवळ उदरनिर्वाहासाठीच तयार करत नाही तर स्त्री चेतना जागृत करून सामाजिक अत्याचारांपासून मुक्ती मिळवण्यासाठी तयार करते.

**महिलांचे औद्योगिक दृष्ट्या योगदान**

देशाच्या आर्थिक विकासात महिला उद्योजकता महत्त्वाचा स्रोत मानली गेली आहे. महिला उद्योजक समाजामध्ये व्यवस्थापन संघटन व व्यवसायाशी संबंधित बाबींमध्ये निरनिराळे आयाम प्रस्तुत करीत आहेत तथापि महिलांनी परिचलित केलेल्या उपक्रमाची संख्या ही एकूण उपक्रमाच्या प्रमाणात फारच कमी आहे. आजच्या आधुनिक गतिमान युगात शाश्वत आर्थिक व सामाजिक विकासाच्या जागतिक वाटचालीमध्ये महिला उद्योजकांची महत्त्वाची

भूमिका राहणार आहे. महाराष्ट्र राज्यात महिलांनी समाजामध्ये जरी मोलाची भूमिका निभवली असली तरीही अनेक कारणांमुळे त्यांच्यावरील उद्योजकीय कार्यक्षमतेला पुरेसा वाव मिळालेला नाही.

सद्यस्थितीत महिला उद्योजकांपुढे लिंगभेद व समाजातील स्थान व्यवसाय सुरू करण्यासाठी अपुरे स्त्रोत तांत्रिक व व्यवस्थापकीय ज्ञानाचा अभाव मर्यादित आर्थिक स्त्रोत व गुंतवणूक सहाय्य परवडण्याजोग्या व सुरक्षित व्यावसायिक जागांचा अभाव इत्यादी अनेक आव्हाने आहेत. राज्याच्या सर्वसमावेशक विकासासाठी महिलाचलित उपक्रमाद्वारे आर्थिक व सामाजिक बदल घडवण्यास प्रोत्साहन देणारे जागतिक दृष्ट्या सक्षम व्यवसाय केंद्र बनवणे व महिला उद्योजकांसाठी पोषक वातावरण निर्माण करणे या दृष्टिकोनातून महिला उद्योजकांसाठी सक्षम धोरण राबविण्यात येणार आहे

औद्योगिक विकासासाठी राज्यात तयार करण्यात आलेल्या पोषक वातावरणाचा लाभ महिला उद्योजकांना मिळावा आणि त्यातून महिलांच्या उद्योजकतेला प्रोत्साहन मिळावे यासाठी विशेष धोरण राबवण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे राज्याने लागू केलेल्या अशा प्रकारच्या धोरणांची देशात प्रथमच अंमलबजावणी होत असून या माध्यमातून राज्याने महिलांना नाविन्य पूर्ण संधी उपलब्ध करून दिली आहे

**निष्कर्ष**

1) आज ज्याप्रकारे भारत हा जगातील सर्वात वेगाने विकसित होणारा देश बनला आहे, त्यादृष्टीने नजीकच्या भविष्यात भारतानेही महिला सक्षमीकरणाचे उद्दिष्ट साध्य करण्यावर भर देण्याची गरज आहे. भारतीय समाजात खऱ्या अर्थाने महिला सक्षमीकरण घडवून आणण्यासाठी, समाजातील पुरुषसत्ताक आणि पुरुषाभिमुख व्यवस्था असलेल्या महिलांवरील वाईट प्रथांची मुख्य कारणे समजून घेऊन ती दूर केली पाहिजेत. महिलांबद्दलची आपली जुनी विचारसरणी बदलून घटनात्मक आणि कायदेशीर तरतुदींमध्ये बदल करणे अत्यंत आवश्यक आहे.

2) आजच्या समाजात अनेक भारतीय महिला राष्ट्रपती, पंतप्रधान, प्रशासकीय अधिकारी, डॉक्टर, वकील इत्यादी झाल्या आहेत, पण तरीही आजही अनेक महिलांना सहकार्य आणि मदतीची गरज आहे. त्यांना अजूनही शिक्षण, आणि मुक्तपणे काम करण्यासाठी, सुरक्षित प्रवास, सुरक्षित काम आणि सामाजिक स्वातंत्र्यासाठी अधिक समर्थनाची गरज आहे. महिला सक्षमीकरणाचे हे कार्य अत्यंत महत्त्वाचे आहे कारण भारताची सामाजिक-आर्थिक प्रगती ही महिलांच्या सामाजिक-आर्थिक प्रगतीवर अवलंबून आहे.

3) महिला सक्षमीकरण महिलांना ते बळ देते, जे त्यांना त्यांच्या हक्कांसाठी लढण्यास मदत करते. आपण सर्वांनी महिलांचा आदर केला पाहिजे, त्यांना प्रगतीची संधी दिली पाहिजे. एकविसावे शतक हे स्त्रीच्या जीवनातील आनंदी शक्यतांचे शतक आहे. महिला आता प्रत्येक क्षेत्रात पुढे येत आहेत. आजची स्त्री आता जागृत आणि सक्रिय झाली आहे. कुणीतरी खूप छान म्हंटले आहे की, "जेव्हा एखादी स्त्री तिच्यावर लादलेल्या बेड्या आणि बंधनं तोडायला लागते, तेव्हा जगातील कोणतीही शक्ती तिला रोखू शकत नाही." सध्या महिलांनी स्टिरियोटाइप मोडण्यास सुरुवात केली आहे. हे एक आनंदाचे लक्षण आहे. लोकांची विचारसरणी बदलत असली तरी या दिशेने अजून प्रयत्नांची गरज आहे.

**संदर्भसूची**

1)उद्योजक गृहिणी ते उद्योग लक्ष्मीची बिकट वाट, सप्टेंबर २०१८.
२)महिला उद्योजकांना प्रोत्साहन गरजेचे महिलांसाठी प्रेरणादायी असा प्रवास
३)www.womenntrepreurs.com